# भांडवलशाही विरोधातील श्रमिक मुक्ती दलाचे लढे

**श्री .सुपने उत्तम बाबासो**
संशोधक विद्यार्थी ,
शिवाजी विद्यापीठ पूरकोल्हा ,

## गोषवारा :

महाराष्ट्रात कामगार, शेतकरी, शेतमजुर, अभयारण्यग्रस्त, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, महिला व आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी डॉ .भारत पाटणकरांच्या नेतृत्वाखाली इ .सन 1980 साली स्थापन झालेल्या श्रमिक मुक्ती दलाने अनेक लढे उभे केले व त्यांना न्याय मिळवून दिला.

शेतकऱ्याना न्याय मिळवून देण्यासाठी श्रमिक मुक्ती दलाने रायगड जिल्ह्यातील टाटा व रिलाईन्स कंपन्यांच्या SEZ प्रकल्पा) औष्णिक विद्युत प्रकल्पाला (विरूद्ध शेतकऱ्याचा लढा उभा केला. तसेच सांगली आणि सातारा जिल्ह्यामध्ये पवनचक्या उभारणार्या बहुराष्ट्रीय कंपन्यांन विरूद्ध लढे उभे केले व शेतकर्यांना न्याय मिळवून दिला.

**Keywords** : भांडवलशाही, SEZ, पवनचक्क्या, कंपन्या

**उद्दिष्टे -:**

1) नव उदारमतवादांमुळे निर्माण झालेले प्रश्न समजून घेणे.

2) शासनाची धोरणे समजून घेणे.

3) श्रमिक मुक्ती दलाचे कार्य समजून घेणे.

**संशोधन पद्धती** -: ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक

आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारने मिश्र आर्थव्यवस्था स्विकारली पण 1955 साली आवडी येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात समाजवादाचा पुरस्कार करणेचा ठराव संमत करनेत आला व तेथून पुढे भारतीय अर्थव्यवस्था काहीशी समाजवादाकडे झुकलेली पहायला मिळाले.अशी व्यवस्था औद्योगीक विकासास मारक होती .कारण उद्योग उभारणीसाठी शासनाच्या अनेक परवानग्या घ्याव्या लागत व अनेक अटींची पूर्तता करावी लागत असे.1990 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडली,जागतीक अर्थिक पुरवठादार संस्थांनी भारतास मदत करणेस नकार दिला,जर भारताने उदारीकरणाचे धोरण स्विकारले तर मदत करू असे जागतीक आर्थिक संस्थांनी सांगितले तेव्हा भारताने उदारीकरणाचे)भांडवलशाहीकडे झुकणारे(धोरण स्विकारले.अनेक जागतीक कंपण्या भारतात गुंतवणूक करू लागल्या .उद्योगासाठी लागणार्या परवानग्याची संख्या खुपच कमी झाली.

2000 साला नंतर भारत सरकारने जलद औद्योगीक विकास घडवून आणण्यासाठी, मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी,निर्यातीत वाढ घडवून आणण्यासाठी चीनच्या धरतीवर SEZ प्रकल्पांना परवानगी देण्याचे धोरण आवलंबिले आहे.

मोठ्या उद्योगांसाठी जास्त जागेची आवश्यकता असते व त्यासाठी जमिन अधिग्रहण करावी लागते त्यामुळे तेथील शेतकरी अशा प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात विरोध करतात.रायगड जिल्ह्यातील खारेपाटण येथे उभारल्या जाणार्या टाटा व रिलाईन्स कंपन्यांच्या औष्णिक विद्युत प्रकल्पाला तेथील शेतकऱ्यानी विरोध केला.शेतकर्यांच्या त्या आंदोलनाला श्रमिक मुक्ती दलाने पार्ठिंबा दिला व शेतकर्यांना न्याय मिळवून दिला .

तसेच भारत सरकारने उदार आर्थिक धोरण स्विकारल्यावर आपल्या देशात जलद गतीने औद्योगीकरण घडून आले त्यामुळे विजेची मागणी वाढली.आपल्या देशात औष्णिक व पवन उर्जा निर्मिती खुप वाव आहे त्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पवन उर्जा प्रकल्प उभारण्यास सुरूवात केली.या कंपन्यानी कवडीमोल भावाने शेतकर्यांच्या जमिनी विकत घेतल्या त्याला सांगली व सातारा जिल्ह्यांमध्ये श्रमिक मुक्ती दलाने विरोध केला व शेतकर्यांना फायदेशीर ठरणारा निर्णय घेण्यास शासनास भाग पाडले.

**श्रमिक मुक्ती दलाचे भांडवलशाहीला विरोध करणारे लढे-:**

**1) रायगड जिल्ह्यातील SEZ ला विरोध करणारा लढा-**

महाराष्ट्र व भारत सरकारने सन 2007 मध्ये रायगड जिल्ह्यात खारेपाटण परिसरात टाटा व रिलाईन्स या कंपन्यांना SEZ अंतर्गत औष्णिक विद्युत प्रकल्प उभा करण्याची परवानगी दिली व तेथिल जमिन प्रकल्पासाठी अधिग्रहन करण्याची अधिसुचना काढली.तेथील शेतकर्यांनी या प्रकल्पाला विरोध केला व आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी व बेकायदेशीर भूसंपादन थांबविण्यासाठी शेतकर्यांसाठी लढणार्या श्रमिक मुक्ती दलाचे नेते डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन उभे केले.या आंदोलनामध्ये शहापूर,धेरंड,धाकटे शहापूर,कोपर,चरी व कोलटेंभीसह नऊ गावातील शेतकर्यांनी भाग घेतला.अगोदर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण व नंतर बेमूदत धरणे आंदोलन चालू केले पण शासन त्याची दखल घेत नाही असे दिसून आल्यावर 2 ऑक्टोंबर 2008 रोजी गांधी जयंती दिवशी अलिबाग ते मंत्रालय असा लाँग मार्च सुरू केला .त्यानंतर शासकिय पातळीवर हालचाली सुरू झाल्या व भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यासाठी पुनर्वसन अधिनियम लागू करणे आवश्यक होते या मुद्यास शासन स्तरावर मान्यता देण्यात आली व आंदोलन कर्त्यांना चर्चेसाठी बोलविले पण आंदोलन कर्ते प्रकल्प रद्द करण्याच्या भूमिकेवर ठाम राहिले कारण या प्रकल्पामुळे केवळ शेतकरी बेघर होणार नव्हते तर कोकणच्या निसर्ग सौंदर्याला बाधा पोहचणार होती व खुप मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होणार होते.श्रमिम मुक्ती दलाने पर्यायी शेतकर्यांच्या पर्यावरण स्नेही SEZ चा पर्याय शासनाला सुचविला होता.अखेर श्रमिक मुक्ती दलाच्या लढ्याला यश मिळाले.श्रमिक मुक्ती दलाने जैतापूर अणुउर्जा प्रकल्पालापण विरोध केला व तेथेपण पर्यावरण स्नेही विद्युत प्रकल्प उभे करावेत अशी भुमिका घेतली.दि .30/12/2011 रोजी महात्मा फुले नगर, देवरूख येथे श्रमिक मुक्ती दलाच्या अधिवेशनात या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन करण्याचा ठराव पास केला.

**2) पवनचक्की कंपन्यांविरूद्धचा लढा-:**

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सातारा व सांगली या जिल्ह्यातील पर्जन्यछायेच्या दुष्काळी भागातील गरीब शेतकर्यांच्या जमिनी पवनचक्क्या उभ्या करण्यासाठी दलालांमार्फत कवडी मोल भावाने विकत

घेण्यास सुरूवात केली होती,शेतकरी लुबाडला जात होता तेव्हा श्रमिक मुक्ती दलाने शेतकर्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी या कंपन्यांच्या विरूद्ध आंदोलन सुरु केले, त्या शेतजमिनीवर शेतकऱ्याची पण मालकी रहावी अशी भूमिका घेतली तसेच शेतीवरून वाहणार्या वारा या नैसर्गिक स्त्रोतावर पण शेतकऱ्याचा हक्क आहे व त्याचापण त्याला मोबदला मिळावा ही भूमिकी घेतली व वार्याचा मोबदला म्हणून शेतकऱ्यास प्रति ऐकर 2 लाख रूपने कंपनीला शेतकऱ्यास देने भाग पाडले व त्या गावाच्या ग्रामपंचायतीस प्रति मेगायुनिट मागे 15000 रू देण्यास भाग पाडले .हा लढा 2008 मध्ये सुरू झाला होता व तो 2010 मध्ये संपुष्टात आला.अशा प्रकारे श्रमिक मुक्ती दलाने भांडवलशाही व्यवस्थेत गरीबांवर होणार्या अन्यायाविरूद्ध लढून न्याय मिळवून दिला.

**निष्कर्ष -:**

नव उदारमतवादी व्यवस्था भांवलशाहीला पुरक आहे व त्यामुळे ती भांडवलदारांना फायदेशीर व गरीब शेतकरी कामगारांसाठी मारक आहे पण देशाच्या विकासासाठी ती गरजेचीपण आहे .

**संदर्भ-:**

1) WIKIPEDIA-Shramik Mukti Dal

2) श्रमिक मुक्ती दल मुलभूत भूमिकेचा जाहिरनामा-डॉ.भारत पाटणकर,प्रकाशन-शिव ऑफसेट, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती 28 डिसेंबर 2012

3) पर्यायी विकास निती-डॉ.भारत पाटणकर,प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी 1991

4) दैनिक सकाळचा दि.14/01/2008 चा अंक

5) दैनिक लोकमतचा दि.07/10/2008 चा अंक

6) देवरूख,जि.रत्नागीरी येथील श्रमिक मुक्तीदलाच्या अधिवेशनाचे इतिवृत्त

7) The Hindu

8) Economic & political Weekly

9) youtube channels

10) दैनिक सकाळचा दि .06/01/2022 चा अंक